# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रेसनोट

दिनांक 07/10/2024

### "कत्तलखान्याशी निगडीत निविदा प्रक्रिया रद्द"

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 (12) अन्वये कत्तलखाने बांधणे किंवा संपादन करणे व ते सुस्थितीत ठेवणे आणि त्यांचे नियमन करणे हे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गोवंश हत्याबाबतच्या कायद्यान्वये गोवंश हत्येस बंदी असल्याने कत्तलखान्यात देखील त्यांची कत्तल करण्यात येत नाही, याबाबत समाजामध्ये गैरसमज पसरला आहे. त्यामुळे गोमातेला राज्य मातेचा दर्जा देण्याच्या राज्य शासनाच्या धोरणावर उपहासात्मक टिपणी करण्यात येत असून शासनाच्या मुळ भूमिकेशी विसंगत बाबी समाजामध्ये पसरत आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाने कत्तलखाना बांधण्यासाठी रु.50.00 कोटीचे अनुदान मंजूर केले आहे. कत्तलखाना बांधण्यासाठी आरक्षण प्रस्तावित आहे. तथापि, नजिकच्या काळातील आदर्श आचारसंहितेचा अंमल आणि कत्तलखान्याचे आरक्षणास शासन मंजूरीच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि, सदर कत्तलखाना बांधणेबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील लोकप्रतिनिधी व विविध संघटना/संस्था यांचेकडून आलेले निवेदन व लोकभावना विचारात घेता सदर आरक्षणाची मान्यता प्रलंबित असल्याने कत्तलखाना बांधणे कामाची निविदा रद्द करण्यात आली आहे.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका